


दैनिक

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध

# अक्षराज

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com

**आतील पानात वाचा...**



अभिनयाचा नटसम्राट आणि माणुसकीचा महामानव हरपला

वर्ष ०३ रे • अंक ३५० वा • पाने ०४ • किंमत : ३ रुपये • ठाणे, शुक्रवार, दि.०९ ऑक्टोबर २०२६ • RNI NO.: MAHMAR/2022/82056 • Declaration/SDM/SR.No.108/2023

YEAR : 03 • ISSUE : 350 • PAGES : 04 • PRICE RS. : 03 • THANE, Friday, 09 October 2026 • RNI NO.: MAHMAR/2022/82056 • Declaration/SDM/SR.No.108/2023

# १४ ऑक्टोबरला, राजकारणात मोठा भूंकप ?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, दिल्ली :** लोकसभा निवडणूक आणि विविध राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये देखील भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये एनडीएला मोठं यश मिळालं होतं. त्यानंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आणि पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये देखील भाजपचा दणदणीत विजय झाला. या निवडणुकांनंतर इंडिया आघाडीमधून अनेक दिग्गज नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचं पहायला मिळत आहे. पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत तृणमूलचा मोठा पराभव झाला, तृणमूल काँग्रेसच्या पराभवानंतर पक्षात मोठी फूट पडली. तब्बल वीस खासदारांनी तृणमूलची साथ सोडत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला. तसेच ५८ आमदारांनी देखील वेगळा गट निर्माण केला. महाराष्ट्रात देखील शिवसेना ठाकरे गटाला मोठा झटका बसल्याचं पहायला मिळालं. शिवसेना ठाकरे गटाच्या ९ पैकी तब्बल सहा खासदारांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. दरम्यान तृणमूल काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटात पडलेल्या फुटीनंतर आता



आणखी एका मोठ्या पक्षात फूट पडली आहे. समाजवादी पक्षात मोठा धक्का बसला असून, उत्तर प्रदेशमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वीच अखिलेश यादव यांना मोठा झटका बसला आहे. सपाच्या तीन बंडखोर आमदारांनी आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची घोषणा केली आहे. १४ ऑक्टोबर रोजी हे आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. यामध्ये अमेठीच्या गौरीगंज विधानसभा मतदारसंघाचे आमदार राकेश प्रताप सिंह, अयोध्येच्या गोसाईगंज विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभय सिंह आणि जालानच्या कालपी विधानसभा मतदारसंघाचे आमदार विनोद चतुर्वेदी हे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी हा अखिलेश यादव यांना मोठा धक्का मानला जात आहे. भाजपच्या नेत्या स्मृती इराणी यांच्या उपस्थितीमध्ये हे सर्व आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. राकेश प्रताप सिंह हे गौरीगंज मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. राकेश प्रताप सिंह यांची या मतदारसंघावर मजबूत पकड आहे. ते आता भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. अशा परिस्थितीमध्ये राकेश प्रातप सिंह यांनाच या मतदारसंघातून भाजपकडून उमेदवारी मिळू शकते अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

# पुण्यात एमपीएससी विद्यार्थ्यांना आंदोलनस्थळी, पोलीस व्हॅनमधून अनाउन्समेंट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पुणे :** पुण्यातून मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई हायकोर्टाने नुकतेच महत्त्वाचे आदेश दिले आहेत. सर्वसामान्य पुणेकरांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश हायकोर्टाने प्रशासन आणि विद्यार्थ्यांना दिले आहेत. पुण्यातील वाहतुकीवर या आंदोलनामुळे कोणताही परिणाम होऊ नये, असेदेखील निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. हायकोर्टाच्या आदेशानंतर आता पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. पोलिसांकडून आंदोलनस्थळी पोलीस व्हॅनमधून अनाउन्समेंट केली जात आहे. विद्यार्थ्यांना आंदोलनस्थळ रिकामे करण्यास सांगण्यात येत आहे.

रोहित पवार यांच्या नेतृत्वात सुरु असलेलं एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन हे रस्त्यामध्ये सुरु असल्याने पुणेकरांना त्याचा त्रास होतो, अशी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली होती. याच याचिकेवर बुधवारी (७ सप्टेंबर) सुनावणी पार पडली होती. यावेळी हायकोर्टाने महत्त्वाचे निर्देश दिले. आंदोलनामुळे रस्ते, पूल किंवा सार्वजनिक ठिकाणी पुणेकरांचे जनजवीनावर परिणाम होऊ नये याची





काळजी घेण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत.

**पोलीस व्हॅनमधून अनाउन्समेंट, आंदोलकही आंदोलावर ठाम**

यानंतर पोलिसांकडून आंदोलनस्थळी पोलीस व्हॅनमधून अनाउन्समेंट करण्यात येत आहे. पुणे पोलिसांनी याबाबत आंदोलकांना नोटीस दिली होती. त्यानंतर आता पोलिसांकडून आंदोलनस्थळी पोलीस व्हॅनमधून अनाउन्समेंट केली जात आहे. दुसरीकडे आंदोलक आंदोलनावर ठाम आहेत. आंदोलक आंदोलनस्थळी एकवटले आहेत. रोहित पवार स्वत: आंदोलनस्थळी उपस्थित आहेत. पुण्यातील एस. एम जोशी पूल येथे हे आंदोलन सुरु आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे या देखील आंदोलनात सहभागी झाल्या आहेत. तुम्हाला कुणीही उठवू शकत नाही, असं रुपाली पाटील म्हणाल्या आहेत.

**पोलीस व्हॅनमधून नेमकी अनाउन्समेंट काय?**

सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण होईल, तसेच नागरिकांच्या दैनंदिन कामास आणि सार्वजनिक कामास बाधा येईल, असे कोणतेही कृत्य करु नये. आंदोलनादरम्यान कायदा आणि सुव्यवस्था बिघडवणारी कृती करणे, रस्ता अडवणे असे करु नये. अन्यथा कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**रोहित पवार यांचे नवे ट्विट!**

दरम्यान, आमदार रोहित पवार यांनी नवीन ट्विट करत आरोप केले आहेत. एमपीएससी अध्यक्षच भ्रष्ट असल्याने पेपरफुटीच्या वेगवेगळ्या क्लुप्त्या समोर येत आहेत. आत्ता OMR Sheet प्रक्रियेबाबत देखील विद्यार्थ्यांचे गंभीर आरोप समोर येत आहेत. MPSC ने दीड वर्षापासून जचठ वरील "Total No. of Questions Attempted' हा पर्याय कोणतेही स्पष्ट Notification न काढता हटवला आहे आणि याचाच गैरफायदा घेऊन पैसे घेऊन उमेदवारांचे OMR परीक्षेनंतर भरले जात असल्याचा विद्यार्थ्यांचा संशय आहे, असं रोहित पवार म्हणाले आहेत.

हा पेपरफुटीपेक्षाही गंभीर प्रकार आहे, कारण यात पुरावेही मागे न राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे MPSC ने हा बदल केल्यापासून आजपर्यंतच्या सर्व परीक्षांचे स्वतंत्र फॉरेन्सिक ऑडिट करावे. २४ डिसेंबर २०२५ च्या पाचवा पर्याय अनिवार्य करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करावी किंवा "Total No. of Questions Attempted' पर्याय पुन्हा सुरू करावा, अशी मागणी रोहित पवारांनी केली आहे.

# नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाक्षेत्रात मोठी पोकळी- रामदास आठवले

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०८, महाबळेश्वर :** ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या आकस्मिक निधनाने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाबद्दल केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी महाबळेश्वर दौऱ्यादरम्यान तीव्र दुःख व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

नाना पाटेकर हे अत्यंत धडाडीचे, सक्रिय आणि समाजाला वेगळी दिशा देणारे ज्येष्ठ कलाकार होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या दमदार अभिनयाचा, प्रभावी संवादफेकीचा आणि आक्रमक शैलीचा स्वतंत्र ठसा उमटवला, असे आठवले म्हणाले.

'प्रहार', 'नटसम्राट', 'परिंदा' यांसह अनेक चित्रपटांतील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहतील. नाना हे केवळ उत्तम अभिनेते नव्हते, तर सामाजिक जाणिवेचे आणि समाजाला जोडणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते, असेही आठवले यांनी नमूद केले.

**शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याचा गौरव :** नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करताना आठवले म्हणाले की, मराठवाडा व विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी नानांनी पुढाकार घेत महत्त्वपूर्ण सामाजिक कार्य केले. त्यामुळे अभिनयासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांची ओळख निर्माण झाली.

**भेट न होऊ शकल्याची खंत :** नाना पाटेकर यांच्यासोबतच्या भेटीच्या आठवणी सांगताना आठवले भावुक झाले.



गेल्या पाच-सहा महिन्यांपूर्वी एका मित्रामार्फत नानांना भेटण्याचा संदेश मिळाला होता. मात्र, माझ्या व्यस्त वेळापत्रकामुळे पुण्याला जाऊन त्यांची भेट घेता आली नाही, याची आज खंत वाटते. त्यांच्या अंत्यविधीसाठी मी स्वतः पुण्याला जाणार आहे, असे आठवले यांनी सांगितले.

नाना पाटेकर यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रासह देशाच्या कलाक्षेत्रात आणि चित्रपटसृष्टीत कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि केंद्र सरकारच्या वतीने नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत असल्याचे आठवले यांनी सांगितले. नाना पाटेकर यांच्यावर पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील फार्महाऊसवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचेही जाहीर करण्यात आले आहे.

**दौऱ्यावेळी पदाधिकारी उपस्थित :** केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या महाबळेश्वर दौऱ्यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक बापू गायकवाड, तालुका अध्यक्ष जॉन भाई जोसेफ, कार्याध्यक्ष आतिश भोसले, महाबळेश्वर शहर अध्यक्ष विनय गायकवाड, उद्योजक आघाडी सातारा जिल्हाध्यक्ष मिथुन तलवलकर, शहराध्यक्षा फौजिया मुलाणी, रोहित कटके (सातारा विधानसभा संघटक, शिवसेना शिंदे गट) तसेच चंदू इनामदार आदी उपस्थित होते.

# दोन वर्षांपासून पाहिजे असलेला सराईत आरोपी जेरबंद लक्ष्मीनगर पोलिसांची कारवाई

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**



**दि.०८, येरवडा :** येरवडा पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात मागील दोन वर्षांपासून पाहिजे असलेल्या सराईत आरोपीला लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने शिताफीने जेरबंद केले. अथर्व विशाल वाघ (वय २३, रा. मदर तेरेसा नगर, मच्छी मार्केट, शेलार चाळ, येरवडा) असे आरोपीचे नाव आहे.

आरोपी येरवडा परिसरातील मच्छी मार्केट येथे फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलीस अंमलदार भिमराव कांबळे व पोलीस हवालदार मयुर सूर्यवंशी यांना मिळाली. त्यानंतर तपास पथकाने सापळा रचून आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहताच आरोपीने गल्लीबोळातून पळ काढला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय लिगाडे, पोउपनि महेश नलावडे, पोलीस हवालदार मयुर सूर्यवंशी, गणेश लोखंडे, श्रीनाथ कांबळे तसेच पोलीस अंमलदार भिमराव कांबळे, सुरज ओंबासे, अमोल वायाळ व लहू गडमवाड यांनी केली. आरोपीला पुढील कारवाईसाठी येरवडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# मुंबईला उष्णतेच्या लाटेचा इशारा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुंबई :** राज्यात यंदा अपेक्षित पाऊस पडलेला नाही. अल-निनोच्या संकटामुळे राज्यातील मान्सूनवर मोठा परिणाम पडला आहे. जुलै महिन्यात राज्यात सर्वदूर चांगला पाऊस पडला. त्यानंतर राज्यात हवा तसा पाऊस पडला नाही. यामुळे राज्यावर कोरड्या दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. राज्यातील दुष्काळाची परिस्थिती पाहता राज्य सरकारने जवळपास ८० टक्के तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. एकीकडे राज्यातील जनता या संकटाशी सामना करत असताना आता हवामान विभागाकडून उष्णतेच्या लाटेबाबत मोठा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून नागरिकांचा काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

हवामान विभागाकडून राज्यातील चार जिल्ह्यांना ९ ऑक्टोबरसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला. हवामान विभागाकडून पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा सहा जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. या काळात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच सिंदुदुर्ग जिल्ह्यात दुपारनंतर किंवा संध्याकाळनंतर विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



**१० ऑक्टोबरला देखील उष्णतेच्या लाटेचा इशारा**

हवामान विभागाकडून १० ऑक्टोबरला देखील उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, येत्या १० ऑक्टोबरला तीन जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे. यामध्ये ठाणे, रागड आणि रत्नागिरी जिल्ह्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे रत्नागिरीत उष्ण आणि दमट वातावरण राहणार असून संध्याकाळी ढगांच्या गडगडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**उर्वरित राज्यात काय परिस्थिती राहणार?**

दरम्यान, कोकण किनारपट्टीवरील जिल्हे वगळता इतर राज्यांमध्ये कोरडे वातावरण राहणार असल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. असं असलं तरी तापमानात वाढ झालेली बघायला मिळू शकते. सर्व जिल्ह्यांमध्ये कडाक्याचे ऊन पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**यंदा ऑक्टोबर महिन्यात तापमान उच्चांक गाठणार?**

ऑक्टोबर महिन्यात दरवर्षी तापमानात वाढ होते. पण यंदा ऑक्टोबर महिन्यात तापमानाचा उच्चांक गाठण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अशावेळी नागरिकांनी भरपूर पाणी पिणं आणि स्वत:ची काळजी घेणं जास्त आवश्यक आहे. दरम्यान, हवामान विभागाकडून ८ ऑक्टोबरसाठी देखील ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी या चार जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. या काळात नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं.

# सरकारकडून दुष्काळात केवळ घोषणा, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत नाही

**अक्षराज : वसंत रांधवण**




**दि.०८, अहिल्यानगर :** जिल्ह्यात दुष्काळाची तीव्र परिस्थिती निर्माण झाली असून शासनाकडून केवळ घोषणा केल्या जात आहेत; मात्र प्रत्यक्ष मदत शेतकर्यांपर्यंत पोहोचत नाही. सरकार शेतकर्यांचा अंत पाहत आहे, असा आरोप ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांनी बुधवारी नगरमधील 'इंडिया आघाडी'च्या मोर्चा प्रसंगी बोलताना केला.

दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजुरांना तातडीने मदत द्यावी, तसेच मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची (एसआयआर) प्रक्रिया रद्द करावी, या मागण्यांसाठी आमदार दानवे व शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली 'इंडिया आघाडी'ने जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाड्या व ट्रॅक्टर घेऊन शेतकऱ्यांचा जनआक्रोश मोर्चा काढला. सरकारविरोधी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या मोर्चानंतर दानवे यानी पत्रकारांशी संवाद साधला.

अंबादास दानवे म्हणाले, जिल्ह्यात सध्या दुष्काळी परिस्थिती गंभीर होत आहे. अशा वेळी सर्वप्रथम जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. केवळ पंचनामे करून शेतकर्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यांच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचली पाहिजे. सरकार संवेदनशील राहिलेले नाही. सरकारला निवडणुकांमध्ये रस असून, शेतकर्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही. केवळ घोषणांचा पाऊस पडला जात आहे. शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची (एसआयआर) प्रक्रिया रद्द करावी,मतदारांचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवावा आणि पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाऊ नयेत, अशी मागणी मोर्चातून करण्यात आली. जुन्या आरटीओ कार्यालयापासून मोर्चाला सुरुवात झाली व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नेण्यात आला.

यावेळी आमदार सुनील शिंदे, प्रताप शेळके, सिताराम काकडे, संदिप वर्पे,गोरख दळवी, किरण काळे, सुभाष लांडे, किरण पाटील,दीप चव्हाण तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सावधान! पेरणे फाटा येथे मुले पळविणारी टोळी पकडल्याची बातमी 'फेक'

## लोणीकंद पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०८, पेरणे (पुणे) :** हवेली तालुक्यातील पेरणे फाटा परिसरात लहान मुले पळविणारी टोळी पकडण्यात आल्याचा दावा करणारा एक व्हिडिओ गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर (WhatsApp आणि Instagram वर) प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमुळे संपूर्ण परिसरात, विशेषतः महिला आणि पालकांमध्ये चिंतेचे व भीतीचे वातावरण पसरले आहे. मात्र, या व्हिडिओची सत्यता तपासली असता, ही माहिती संपूर्णपणे खोटी आणि तथ्यहीन असल्याचे लोणीकंद पोलीस ठाण्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**व्हिडिओची पडताळणी आणि पोलिसांचे स्पष्टीकरण**

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या या व्हिडिओची लोणीकंद पोलिसांनी तातडीने दखल घेत पडताळणी केली. तपासाअंती पोलिसांना आढळून आले की, पेरणे फाटा किंवा त्याच्या आसपासच्या परिसरात लहान मुले पळविणारी कोणतीही टोळी सक्रिय नाही आणि अशी कोणतीही टोळी पकडल्याची घटना घडलेली नाही. हा व्हिडिओ चुकीच्या आणि खोट्या दाव्यांसह नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी पसरवला जात आहे.

**अफवा पसरवणाऱ्यांवर होणार कायदेशीर कारवाई**

लोणीकंद पोलीस प्रशासनाने नागरिकांना कडक इशारा दिला आहे की, सोशल मीडियावर येणारा कोणताही व्हिडिओ, मेसेज किंवा ऑडिओ क्लिप सत्य असल्याची खात्री केल्याशिवाय पुढे पाठवू नये. अशा प्रकारच्या खोट्या बातम्यांमुळे समाजात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अफवा पसरविणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर सायबर कायद्यांतर्गत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

**पालकांना आणि नागरिकांना पोलिसांचे आवाहन:**

घाबरून जाऊ नका: पेरणे फाटा परिसरात अशी कोणतीही घटना घडलेली नसल्याने महिला, पालक आणि नागरिकांनी घाबरून जाण्याचे काहीही कारण नाही.

**फॉरवर्ड करणे टाळा :** अशा कोणत्याही संशयास्पद मेसेज किंवा व्हिडिओची खात्री केल्याशिवाय ते ग्रुप्सवर शेअर करू नका.

**सत्यता तपासा :** कोणतीही माहिती मिळाल्यास थेट पोलिसांशी संपर्क साधून अधिकृत माहिती घ्या, अफवांवर विश्वास ठेवू नका.




## क्रांतिवीर नाना पाटेकर

मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा अमिट असा ठसा उमटवणारे अभिनेते म्हणून ज्यांची ओळख राहिली, त्या ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे आज हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

१९९०च्या दशकात आमच्या जनरेशन एक्स आणि जनरेशन वायवर नाना पाटेकर यांनी आपल्या रांगड्या अभिनयाने अधिराज्य गाजवले होते. माझा मित्र विजय गुंड आणि मी ‘क्रांतिवीर’ हा त्यांचा सिनेमा व्हिडिओ सेंटरमध्ये एकाच दिवसात लागोपाठ तीन वेळा पाहिला. आज विजय गुंड शिक्षक संघटनेचा नेता बनला आहे. ‘क्रांतिवीर’ सिनेमातील नाना पाटेकर यांच्या भूमिकेचा प्रभाव त्याच्यावर इतका पडला आहे की, तो आज शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरुद्ध नाना पाटेकर यांच्या शैलीत आवाज उठवत आहे.

सिनेमा हे दृश्य माध्यम खरंच सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचे साधन आहे. नाना पाटेकर यांच्यासारखे अभिनेते त्यांच्या कारकिर्दीतील तरुण पिढीच्या मनोभावना आणि बुद्धीवर अप्रत्यक्षपणे संस्कार करतात. स्व. नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहताना त्यांच्या ‘क्रांतिवीर’ सिनेमाची कथा सांगण्याचा मोह मला आज आवरत नाही.

इयत्ता आठवीत असताना नाना पाटेकर यांचा ‘क्रांतिवीर’ सिनेमा पाहायला मिळाला. पथनाट्याप्रमाणे तयार झालेला हा सिनेमा खरंच ‘भ्रष्ट व्यवस्थेला’ धडका देतो. सामान्य माणूस या व्यवस्थेपुढे नांगी टाकतो. भिंतीवर बुक्क्या मारून भिंत फुटत नाही; पण हात मात्र रक्तबंबाळ होतो, हा अनुभव तो वेळोवेळी घेत असतो. आपले बळ तोकडे आहे, या समजुतीतून लाचारपणे तो जीवन जगत राहतो.

‘इन्साफ नहीं मांगने से मिलता है और ना ही छीनने से आज तो इन्साफ बिकता है, सिर्फ बिकता है!’

अशी सुसाट डायलॉगबाजी नाना सिनेमात जागोजागी करतात. सिनेमा पाहून आल्यानंतर ज्याप्रमाणे अण्णा हजारे यांच्या आंदोलनात ‘मी अण्णा हजारे आहे’, अशा आविर्भावात सगळेजण सहभागी झाले होते, त्याप्रमाणे ‘मी क्रांतिवीर’ ही चेतना हा सिनेमा पाहणाऱ्याच्या मनामध्ये निर्माण करतो. एखादा सिनेमा सामान्य माणसाचे डोळे खाडकन उघडू शकतो, याची प्रचिती हा सिनेमा पाहिल्यानंतरच येते. ‘क्रांतिवीर’मधील नाना ‘रगेल’ आणि ‘रंगेल’ भूमिकेत दाखवला आहे. तो एकाच वेळी शासन, प्रशासन व गुंड-पुंड या सर्वांविरुद्ध लढतो. ‘कलम वाली बाई’ म्हणजे डिंपल कपाडिया नानाच्या वस्तीत एक लोकल वर्तमानपत्र चालवत असते. ती वेळोवेळी नानाची डायलॉगबाजी पाहून ‘इम्प्रेस’ होते.

एका ठिकाणी ती नानाला म्हणते, तू रक्षा करना जानता है और सजा दिलाना भी जानता है, न्याय क्या है, ये तू अच्छी तरह जानता है. तू हर बात को हंसी में क्यों टाल देता है? तू खुद भी जाग और लोगों को भी जगा.

त्यावेळेस मिसळपाव खात बसलेला नाना तिच्या पायावर लोटांगण घेत म्हणतो, अरे, कलम वाली बाई, तेरे पाँव छूता हूँ. मुझे उसळपाव खाने दे. मुझे गांधी नहीं बनना, मुझे सुभाषचंद्र बोस नहीं बनना. मैं भूखा हूँ, मुझे खाने दे. क्यों मेरे पीछे पड़ी है?

कलम वाली बाई अक्षरशः तेथून पळ काढते. पुढे नाना तिच्या सांगण्यावरूनच ‘क्रांतिवीर’ बनतो व क्रांती घडवून आणतो.

बीडी पीता हूँ, मुँह से बदबू आती है! सोच ले, शादी करेगी क्या?

असं म्हणून जेव्हा तो कलम वाली बाईशी संवाद साधतो, तेव्हा आपल्या रांगडेपणाशी कुठल्याही प्रकारचं ‘कॉम्प्रमाइज’ न करण्याची त्याची वृत्ती सिनेमाला एक वेगळाच ‘टच’ देऊन जाते.

झोपडपट्टीतील संस्कृती कोणत्याही कला प्रकारातमग ते साहित्य, नाट्य किंवा सिनेमा असोउभी करण्याचं धाडस कोणी दाखवत नाही. परंतु ‘क्रांतिवीर’मध्ये झोपडपट्टी आणि तेथे राहणारे रंजलेले, गांजलेले, फाटके-तुटके लोक कशा पद्धतीने एकमेकांशी मिळून-मिसळून व भाईचाऱ्याने जगत असतात, हे दाखवण्याचे काम या सिनेमात केले आहे. त्याबरोबर नानासारखं एखादं दुसरं ‘कॅरेक्टर’ प्रत्येक झोपडपट्टीत हमखास असतंच, हेही या ठिकाणी अधोरेखित केलं आहे.

वस्तीतील एका एकल महिलेला तिची सासू काही गुंडांच्या मदतीने त्रास देत असते. नाना हे उघड्या डोळ्यांनी पाहतो; पण तिला थेट मदत करत नाही. ‘आज बचाऊँगा, कल कौन आएगा तुम्हें बचाने?’ असं म्हणून तो तिला सर्वांविरुद्ध लढण्यास प्रेरित करतो. ‘स्त्री सबलीकरणाची’ ही पद्धत विचार करायला लावणारी आहे.

धार्मिक द्वेषाचे राजकारण जेव्हा घडवले जाते, तेव्हा एकमेकांशी गुण्यागोविंदाने राहणारी माणसे एकमेकांच्या जीवावर उठतात. अख्खी झोपडपट्टी पेटवून दिली जाते. झोपडपट्टी स्मशानभूमीत बदलली जाते. प्रताप (नाना पाटेकर), कलम वाली बाई (डिंपल कपाडिया) व झोपडपट्टीचा मालक लक्ष्मीदास (परेश रावल) लोकांना वाचवण्याचे काम करतात. लोकांना समजावून सांगतात. नाना आपलं आणि इस्माईल चाचाचं बोट दगडाने फोडून जेव्हा म्हणतो, ये मुसलमान का खून और ये हिंदू का खून. बता, इसमें हिंदू का कौन-सा है और मुस्लिम का कौन-सा है? साले, ऊपरवाले ने बनाने में कोई फर्क नहीं किया. तू कौन होता है? तेव्हा सिनेमागृहात प्रचंड शिट्ट्या आणि टाळ्या झाल्याशिवाय राहत नाहीत. तेथे आलेल्या राजकारणी लोकांना तो तेथून पळवून लावतो.

लहानपणापासून ‘इधर मत मारना, छोटा दिमाग होता है!’ असं म्हणून काहीसं ‘विचित्र’ आणि ‘विशिष्ट’ वागणारा नाना रोखठोक आणि स्पष्ट शब्दांत आपल्या सगळ्यांचं सिनेमा पाहताना डोकं ठिकाणावर आणतो.

ज्याप्रमाणे टी-२० सामन्यात किंवा एकदिवसीय क्रिकेटच्या सामन्यात शेवटच्या षटकात फलंदाज ‘आउट तर आउट’ या वृत्तीने फटकेबाजी करत असतो, त्याप्रमाणे नाना सिनेमाच्या शेवटी अशी काही फटकेबाजी करतो की डोक्याचा भुगा झाल्याशिवाय राहत नाही.

कलम वाली बाई क्रांती लाना चाहती थी. कौन समझा उसकी बात? मैं समझ गया. कुछ करके जा रहा हूँ; सुकून है.

असं म्हणून फाशीचा तमाशा बघायला आलेल्यांना नाना म्हणतो,

ऊपरवाला भी ऊपर से देखता होगा, तो उसे शर्म आती होगी. सोचता होगा, मैंने सबसे खूबसूरत चीज बनाई थीइंसान. नीचे देखा तो सब कीड़े बन गए कीड़े!

असं म्हणून जमलेल्या लोकांचा तो उपमर्द करतो. तरीसुद्धा कोणी त्याला विरोध करत नाही. त्याच्या बोलण्यातील सच्चाई जमावाला शांत करते.

हम भले ही ऊपरवाले को अलग-अलग नाम से पुकारते हैं लेकिन हमारा धर्म एक है, मजहब एक है इंसानियत.

असं सांगायलाही तो विसरत नाही. या सिनेमातील भूमिकेसाठी नाना पाटेकर यांना ‘सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा’ १९९५ चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच ‘फिल्मफेअर’चे सर्वोत्कृष्ट अभिनेता, कथा आणि सहाय्यक अभिनेत्रीचे पुरस्कारदेखील मिळाले आहेत.

या सर्वांच्या पुढे जाऊन आजदेखील ‘भ्रष्ट व्यवस्थेला धडका मारणारा क्रांतिवीर’ या एका वाक्यातच या सिनेमाचे यथोचित वर्णन करावेसे वाटते.

‘क्रांतिवीर’ सिनेमातील नाना पाटेकर यांच्या अजरामर अभिनयाला आणि त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

**– किशोर जाधव**

# नाना पाटेकर : अभिनयाचा नटसम्राट आणि माणुसकीचा महामानव हरपला

८ ऑक्टोबरची सकाळ चित्रपट रसिकांसाठी अत्यंत दुःखद बातमी घेऊन आली. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गोव्यात हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच चित्रपटसृष्टीसह संपूर्ण मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली. पडद्यावर आपल्या दमदार आवाजाने, तीक्ष्ण नजरेने आणि प्रभावी अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा हा असामान्य कलाकार अचानक कायमचा निघून गेला, यावर अनेक चित्रपट रसिकांचा विश्वासच बसत नव्हता.

नाना पाटेकर हे केवळ एक अभिनेते नव्हते; ते एक संस्था होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाची वेगळी छाप पाडणारा हा कलाकार आज आपल्यात नाही, ही जाणीवच मन हेलावून टाकणारी आहे.

**संघर्षातून घडलेला कलाकार**

१ जानेवारी १९५१ रोजी जन्मलेल्या नाना पाटेकर यांचे मूळ नाव विश्वनाथ पाटेकर. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील मुरुड येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. शालेय जीवनातच त्यांनी नाटकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली. पुढे त्यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण घेतले आणि काही काळ जाहिरात संस्थेतही काम केले.

चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वीचा त्यांचा काळ मात्र अत्यंत संघर्षमय होता. रंगभूमीवर काम करताना मिळणारे मानधन अत्यल्प होते. प्रसिद्धी, पैसा आणि ग्लॅमर यापासून ते त्या काळी खूप दूर होते. मात्र अभिनयाची जिद्द त्यांनी कधी सोडली नाही. जाहिरातीचे काम आणि रंगभूमी अशी तारेवरची कसरत करत त्यांनी स्वतःला घडवले.

१९७८ मध्ये गमन या चित्रपटातून त्यांनी रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. सुरुवातीला छोट्या भूमिका मि



ळत राहिल्या. जवळपास दशकभर संघर्ष केल्यानंतर हमीदाबाईची कोठी या नाटकाने त्यांच्या अभिनयाची ताकद रंगभूमीवर अधोरेखित केली. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीने वेग घेतला.

**आवाज, नजर आणि अभिनयाची स्वतंत्र शैली**

नाना पाटेकर यांचा अभिनय हा पारंपरिक चौकटीत बसणारा नव्हता. त्यांची संवादफेक, आवाजातील चढ-उतार, चेहऱ्यावर क्षणार्धात बदलणारे भाव, संताप व्यक्त करण्याची पद्धत आणि व्यक्तिरेखेच्या मनोविश्वात पूर्णपणे शिरण्याची क्षमता यामुळे ते इतर कलाकारांपेक्षा वेगळे ठरले.

त्यांनी खलनायकाच्या भूमिका केल्या, नायकाच्या भूमिका केल्या, पोलिसांच्या भूमिका केल्या, सैनिकाची भूमिका केली, सामाजिक आशयाच्या व्यक्तिरेखा साकारल्या आणि वेलकमसारख्या चित्रपटात विनोदी भूमिकेने प्रेक्षकांना मनमुराद हसवले.

मोहरे, सलाम बॉम्बे!, परिंदा, अंगार, तिरंगा, क्रांतिवीर, युगपुरुष, खामोशी, गुलाम-ए-मुस्तफा, यशवंत, वजूद, अब तक छप्पन, अपहरण, टॅक्सी नं. ९२११, वेलकम, देऊळ, नटसम्राट अशा असंख्य चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची विविध रूपे दाखवली. परिंदामधील अण्णा, क्रांतिवीरमधील प्रताप नारायण तिलक आणि वेलकममधील उदय शेट्टी या व्यक्तिरेखा त्यांच्या अभिनयाच्या बहुआयामी क्षमतेची उदाहरणे ठरल्या.

**परिंदापासून क्रांतिवीरपर्यंत पुरस्कारांची दखल...**

नाना पाटेकर यांच्या अभिनयाची दखल केवळ प्रेक्षकांनीच नव्हे तर देशातील प्रतिष्ठित पुरस्कारांनीही घेतली.

परिंदासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. त्याच भूमिकेसाठी फिल्मफेअर पुरस्कारही मिळाला. क्रांतिवीरमधील प्रभावी अभिनयासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. अग्निसाक्षीसाठी पुन्हा एकदा राष्ट्रीय पुरस्काराने त्यांच्या अभिनयाचा गौरव झाला. अशा प्रकारे नाना पाटेकर यांनी तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळवले.

अंगार आणि अपहरणमधील नकारात्मक भूमिकांसाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. अब तक छप्पनसाठी बंगाल फिल्म जर्नलिस्ट्स असोसिएशनचा सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळाला. मराठी चित्रपट डॉ. प्रकाश बाबा आमटे – द रिअल हिरोसाठी फिल्मफेअर मराठी पुरस्कार मिळाला. नटसम्राटमधील भूमिकेसाठी झी गौरव पुरस्कारानेही त्यांचा सन्मान झाला.

२०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री या देशातील प्रतिष्ठित नागरी सन्मानाने गौरवले.

**प्रहारसाठी सैनिकासारखे जगले !**

नाना पाटेकर यांनी अभिनयाइतक्याच गांभीर्याने आपल्या भूमिकांची तयारी केली. प्रहार : द फायनल अटॅक या चित्रपटातील कमांडोची भूमिका वास्तवदर्शी करण्यासाठी त्यांनी लष्करी प्रशिक्षण घेतले. या चित्रपटातून त्यांनी दिग्दर्शक म्हणूनही पदार्पण केले.

भूमिकेच्या तयारीसाठी स्वतःला झोकून देण्याची त्यांची ही वृत्ती त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत दिसून आली. पडद्यावर दिसणाऱ्या प्रत्येक व्यक्तिरेखेमागे नानांची प्रचंड मेहनत असायची.

**नटसम्राटमध्ये अभिनयाचा कळस...**

नाना पाटेकर यांच्या कारकिर्दीचा विचार केला तर नटसम्राटचा उल्लेख केल्याशिवाय तो पूर्ण होऊ शकत नाही. वि. वा. शिरवाडकर यांच्या अजरामर नाटकावर आधारित या चित्रपटात त्यांनी गणपतराव बेलवलकरांची भूमिका साकारली.

रंगभूमीवर आयुष्य घालवलेल्या, टाळ्यांचा कडकडाट अनुभवलेल्या आणि वृद्धापकाळात एकाकीपणाशी झुंजणाऱ्या कलाकाराची वेदना नानांनी इतक्या ताकदीने साकारली की गणपतराव बेलवलकर ही व्यक्तिरेखा आणि नाना पाटेकर हे जणू एकरूप झाले. राग, प्रेम, अहंकार, असहायता, वेदना आणि एकटेपणा या सगळ्या भावनांचा विलक्षण आविष्कार या भूमिकेत पाहायला मिळाला.

**कलाकारापलीकडचा माणूस...**

नाना पाटेकर यांचे मोठेपण केवळ त्यांच्या अभिनयात नव्हते. त्यांच्या मनात सामान्य माणसासाठी असलेली आस्था त्यांच्या सामाजिक कार्यातून दिसून आली.

२०१५ मध्ये नाना पाटेकर आणि अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी ‘नाम फाउंडेशन’ ची स्थापना केली. महाराष्ट्रातील दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर या संस्थेचे काम सुरू झाले. शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत देण्याबरोबरच त्यांच्या समस्येच्या मुळावर काम करण्याचा प्रयत्न नाम फाउंडेशनने केला.

**जलसंधारणातून दुष्काळावर मात करण्याचा प्रयत्न...**

शेतकऱ्यांना केवळ मदतीचे पैसे देऊन त्यांची समस्या कायमची सुटणार नाही, हे नाना आणि नाम फाउंडेशनने ओळखले. त्यामुळे जलसंधारण आणि ग्रामीण विकासावर मोठ्या प्रमाणावर काम करण्यात आले.

नदीपात्रांचे पुनरुज्जीवन, नाले व ओढ्यांचे खोलीकरण, पाझर तलावांचे गाळ काढणे, कालव्यांची दुरुस्ती व बांधकाम, शेततळी निर्माण करणे, धरणांमधील गाळ काढणे आणि भूजलपातळी वाढविण्यासाठी विविध कामे करण्यात आली. नाम फाउंडेशनच्या माहितीनुसार त्यांच्या जलसंधारणाच्या उपक्रमांतून महाराष्ट्रातील हजारो गावांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढवण्याचा प्रयत्न झाला असून अनेक नद्या, जलसाठे आणि पाणलोट क्षेत्रांच्या पुनरुज्जीवनाची कामे करण्यात आली आहेत.

ही कामे केवळ पाणी अडवण्यापुरती नव्हती; तर शेतकऱ्याला पुन्हा शेतीकडे आत्मविश्वासाने पाहता यावे, गावात रोजगार आणि जगण्याची आशा निर्माण व्हावी, हा त्यामागचा व्यापक उद्देश होता.

**आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी आधाराचा हात...**

२०१५ च्या भीषण दुष्काळाच्या काळात शेतकरी आत्महत्यांची संख्या वाढत असताना अनेक कुटुंबांवर अक्षरशः आभाळ कोसळले. पती गमावलेल्या महिलांसमोर मुलांचे शिक्षण, घरखर्च आणि शेतीचे भवितव्य असे अनेक प्रश्न उभे राहिले.

नाम फाउंडेशनने अशा कुटुंबांना आर्थिक आणि नैतिक आधार देण्याचे काम केले. संस्थेच्या माहितीनुसार आतापर्यंत ४,९४० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत देण्यात आली असून १,९०० विधवांनाही मदत करण्यात आली आहे. ही मदत केवळ आर्थिक नव्हती; संकटात सापडलेल्या कुटुंबाला आपण एकटे नाही, असा आधार देण्याचा त्यामागचा प्रयत्न होता.

नाना पाटेकर यांनी शेतकऱ्यांच्या मानसिक वेदनेविषयीही सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या सामाजिक कामामध्ये केवळ मदतवाटप नव्हते, तर शेतकऱ्याच्या जगण्याचा प्रश्न समजून घेण्याची आणि त्याला पुन्हा उभे करण्याची धडपड होती. २०२६ मध्येही त्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येऐवजी मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले होते.

**‘नाना’ म्हणून माणसांच्या मनात राहिले**

चित्रपटाच्या पडद्यावर कधी संतापाने गर्जणारा, कधी डोळ्यांतून वेदना व्यक्त करणारा, कधी खलनायक म्हणून अंगावर येणारा, तर कधी वेलकममधून प्रेक्षकांना हसवणारा नाना पाटेकर खऱ्या आयुष्यात मात्र शेतकऱ्यांच्या वेदनेशी जोडला गेला.

त्यांनी प्रसिद्धीचा उपयोग केवळ स्वतःसाठी केला नाही. दुष्काळग्रस्त गावांमध्ये पाणी निर्माण व्हावे, शेतकऱ्याच्या घरात पुन्हा चूल पेटावी आणि आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या कुटुंबाला जगण्याची उमेद मिळावी, यासाठी त्यांनी आपली लोकप्रियता आणि प्रभाव समाजकार्यासाठी वापरला.

म्हणूनच नाना पाटेकर यांना निरोप देताना केवळ एका महान अभिनेत्याला आपण श्रद्धांजली वाहत नाही; तर संघर्षातून उभा राहिलेल्या, कलेला आयुष्य समर्पित केलेल्या आणि माणुसकीला आपल्या परीने हातभार लावलेल्या एका संवेदनशील माणसाला आपण निरोप देत आहोत.

नाना पाटेकर यांचा आवाज आता पडद्यावर नव्याने ऐकू येणार नाही. त्यांची ती धारदार नजर, ती दमदार संवादफेक आणि व्यक्तिरेखेत जीव ओतणारा अभिनय पुन्हा पाहायला मिळणार नाही. पण परिंदा, क्रांतिवीर, प्रहार, खामोशी, अब तक छप्पन, वेलकम, देऊळ, डॉ. प्रकाश बाबा आमटे – द रिअल हिरो, नटसम्राट अशा असंख्य कलाकृतींमधून ते कायम आपल्या स्मरणात राहतील.

आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून उभे राहिलेले पाणीसाठे, हिरवी झालेली गावे, मदतीचा हात मिळालेली शेतकरी कुटुंबे आणि जगण्याची नवी आशा मिळालेले असंख्य चेहरेहीदेखील त्यांच्या आयुष्याची तितकीच मोठी ओळख राहील.

अभिनयाचा ‘नटसम्राट’ हरपला आहे; पण त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा आणि त्यांनी केलेले माणुसकीचे काम त्यांना कायम जिवंत ठेवेल.

**ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## नटसम्राट : एका पर्वाचा अस्त

आज रंगमंचावर
एक दीर्घ शांतता उतरली आहे...
दिवे तेच आहेत,
पडदा तोच आहे.
फक्त नेपथ्यामागे
एक आवाज कायमचा थांबला आहे.

ज्याने शब्दांना
रक्त दिले, श्वास दिला,
ज्याच्या संवादातून
माणूस आपल्या अंतरंगासह
रंगमंचावर उभा राहिला
तो स्वर आज
काळाच्या कुशीत विसावला.

नाना,
तुम्ही भूमिका केल्या नाहीत,
तुम्ही त्या जगलात.
कधी बापाच्या डोळ्यांतले आभाळ झालात,
कधी दुःखाची जळती राख,
कधी अहंकाराचा ज्वालामुखी,
तर कधी माणुसकीच्या शेवटच्या दिव्याची
थरथरती ज्योत...

तुमच्या आवाजात
केवळ दरारा नव्हता,
त्यामागे होते
अनुभवांचे असंख्य ऋतू.
तुमच्या डोळ्यांत
केवळ अभिनय नव्हता
तिथे एक अख्खे आयुष्य धगधगत होते.

आज पडदा पडला आहे,
पण नाटक संपलेले नाही.

कारण काही कलाकार
भूमिका संपवून निघून जात नाहीत.
ते आपल्या स्मृतीत, एक युग ठेवून जातात.

तुमचा आवाज थांबला,
पण संवाद थांबणार नाहीत.
तुमची पावले थांबली,
पण रंगमंचावरची तुमची चाल
पिढ्यान्पिढ्या उमटत राहील.

आज मराठी रंगभूमीच्या आकाशातून
एक ध्रुवतारा निखळला आहे.
आकाश मात्र रिकामे झालेले नाही
तुमच्या प्रकाशाने
अनेक दिवे पेटले आहेत.

अश्रूंनी नव्हे, कलेच्या मस्तकावर
अक्षय मान ठेवून
आज तुम्हाला निरोप देतो...

पडदा पडला आहे, नाना...
पण रंगमंच अजूनही तुमचाच आहे.

तुम्ही गेलात... आणि मराठी रंगभूमीने
आपल्या इतिहासाच्या पानावर नव्हे,
रसिकांच्या हृदयावर
एक अमिट स्वाक्षरी उमटवली.

**नटसम्राट...!**

**– कीर्तिराज आगलावे, पुणे**

# सिनेसृष्टीतील तारा आणि सामाजिक परखड व्यक्तीमत्त्व काळाच्यापल्याड नाहिसा...

नटसम्राट नाना पाटेकर यांच्या अकाली निधनाने एक उत्तम अभिनेता आणि सामाजिक भान असलेला लोकप्रिय कलाकार गमावल्याची भावना सर्वत्र व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. मराठी सिनेसृष्टीसह बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवलेल्या नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वासह महाराष्ट्रावरही शोककळा पसरली आहे. नानांच्या रुपाने प्रतिभावंत कलाकारासह सामाजिक भान असलेले उमदे व्यक्तिमत्व हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कलाकार सामाजिक, राजकीय भूमिका घेत नसल्याचा आक्षेप वारंवार घेतला जातो. मात्र नाना पाटेकर हे नेहमीच याला अपवाद राहिले. नाना पाटेकर यांना गोव्यातील दोना पावला येथील घरी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर त्यांना उपचारासाठी तातडीने मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी त्यांना ४५ मिनिटे ’कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन (सीपीआर) अर्थात हृदय व फुफ्फुसांचे पुनरुज्जीवन’ देऊन त्यांचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र उपचारांदरम्यान पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

नाना पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथे एका मराठी कुटुंबात झाला. त्यांचे खरे नाव विश्वनाथ पाटेकर आहे. हे नाव फार थोड्या लोकांना माहीत आहे. त्यांचे वडील गजानन पाटेकर व्यापारी होते, तर आई निर्मला पाटेकर गृहिणी होत्या. नाना पाटेकर यांना अशोक आणि दिलीप पाटेकर असे दोन भाऊ आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव नीलकंती पाटेकर असून त्या बँक अधिकारी होत्या. नाना पाटेकर यांना दोन मुले, मात्र त्यापैकी एका मुलाचे दुर्दैवाने निधन झाले, तर मल्हार नावाचा मुलगा आहे. चित्रपटसृष्टीमध्ये ते नाना पाटेकर या नावाने परिचित झाले होते. व्यक्तिमत्त्वातील जरब, जबरदस्त संवादफेक या बळावर त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.

नाना पाटेकर यांनी मुंबईत राहून शालेय शिक्षण



पूर्ण केले. त्यांची शाळा समर्थ विद्यालय होती. त्यानंतर त्यांनी वांद्रे स्कूल ऑफ आर्टमध्ये (आताचे एल.एस. रहेजा स्कूल ऑफ आर्ट) शिक्षण घेतले आणि सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून पदवी घेतली आहे. चित्रपट क्षेत्रात नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये ‘गमन’ या सिनेमातून पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या अभिनयाला तीन राष्ट्रीय पुरस्कार, दोन फिल्मफेअर पुरस्कार मिळाले असून २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. याशिवाय अनेक प्रतिष्ठित पुरस्कार आणि सन्मान त्यांच्या नावावर आहेत. प्रहार चित्रपटाच्या तयारीसाठी तीन वर्षांच्या प्रशिक्षण कालावधीनंतर नाना यांना १९९० मध्ये भारतीय प्रादेशिक सैन्यात मानद कॅप्टन म्हणून नियुक्त करण्यात आले आणि त्यांनी जनरल व्ही.के. सिंग यांच्यासोबत काम केले, ज्यांच्याकडे त्यावेळी कर्नलची रँक होती आणि त्यांचा एक कॅमिओ होता. १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान, नाना पाटेकर यांनी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटमध्ये मानद मेजर म्हणूनही सेवा दिली आहे.

नाना पाटेकर यांनी अभिनयासोबत सामाजिक क्षेत्रामध्येही आपल्या कार्याची छाप पाडली होती. त्यांनी नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून शेतक-यांसाठी सामाजिक कार्य सुरु केले होते. समाजातील वंचित घटकांसाठी, प्रामुख्याने दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मोठे सामाजिक कार्य केले आहे. सप्टेंबर २०१५ मध्ये अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासह त्यांनी नाम फाऊंडेशन या संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा (लातूर, उस्मानाबाद) परिसरातील दुष्काळ आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आर्थिक मदत केली. दुष्काळमुक्तीसाठी गावांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि जलसंधारणाची विविध कामे व बंधारे बांधण्याचे मोठे प्रकल्प ’नाम’ फाऊंडेशनच्या माध्यमातून राबवले. शेतकरी कुटुंबातील गरीब मुलींच्या विवाहासाठी आर्थिक हातभार लावणे तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणे ही कामे केली. बिहारमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी ’अनुभूती’ या संस्थेद्वारे निधी दिला. तसेच ’पाठशाला या चित्रपटाचे मानधन आणि राज कपूर पुरस्काराची १० लाख रुपयांची संपूर्ण रक्कम त्यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी दान केली. ते आपल्या मिळकतीचा मोठा वाटा सामाजिक कार्यासाठी व मदतीसाठी वापरत असत.

अशा या ज्येष्ठ अभिनेत्याच्या निधनाचे दुःखद वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असामान्य, संवेदनशील आणि प्रभावी पर्व आज संपले आहे. आपल्या दमदार अभिनयाने, आगळ्या संवादफेकीने आणि प्रत्येक भूमिकेतील विलक्षण सहजतेने त्यांनी रसिकांच्या मनावर कायमची अमिट छाप उमटवली. परिंदा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, वेलकम, पक पक पकाक, देऊळ, नटसम्राट अशा अनेक चित्रपटांमधून त्यांच्या अभिनयाचे विविध पैलू रसिकांना अनुभवायला मिळाले. कलाकार म्हणून यशस्वी असतानाच सामाजिक प्रश्नांप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून केलेली कृतिशील समाजसेवा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तितकाच प्रेरणादायी पैलू होता. त्यांच्या निधनाने भारतीय कलाविश्वाने एक संवेदनशील आणि प्रतिभावान कलाकार, तर समाजाने एक कृतिशील व सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांच्या अभिनयाची, विचारांची आणि सामाजिक कार्याची अमिट छाप सदैव स्मरणात राहील.

**– सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ, ७४९८८८५०६१**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र वन विभाग

**वनक्षेत्रपाल कांदळवन कक्ष रत्नागिरी यांचे कार्यालय,**
६६९, कल्पवृक्ष बंगला, एस.व्ही.रोड, हिंदू कॉलनी, रत्नागिरी ४१५ ६१२.

दूरध्वनी क्र.०२३५२-२९५१४०
Email-rfomratnagiri@gmail.com

## जाहिर निविदा सुचना

विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग दक्षिण कोकण अलिबाग, वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी अंतर्गत रत्नागिरी तालुक्यातील वन-विभागाच्या ताब्यात असलेले क्षेत्राचे सिमाकंन करणेकरीता कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर आरसीसी पिलर्स उभारणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद व जलसंपदा विभाग या विभागांकडे वर्ग १ ते ७ वर्गातील पंजीकृत कंत्राटदारांकडून खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून दिलेल्या प्रपत्रात सिलबंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविणेत येत आहेत. संबंधित कामांबाबतचे निवीदा फॉर्म व अटी शर्ती प्रती काम निहाय रूपये १००/- रोखीन भरणा केल्यास दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी यांचे कार्यालय ६६९, कल्पवृक्ष बंगला, एस. व्ही. रोड, हिंदू कॉलनी, ता.जि. रत्नागिरी ४१५६१२ येथे उपलब्ध होईल.

| | |
|---|---|
| निवीदा प्रकाशित करावयाची तारीख | ०८/१०/२०२६ |
| निवीदा फॉर्म व अटी शर्ती मिळण्याची तारीख व वेळ | ०८/१०/२०२६ ते दि.१४/१०/२०२६ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा भरण्याची अंतीम तारीख | दि.१४/१०/२०२६ दुपारी १२.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत |
| निवीदा उघडण्याची तारीख | दि.१५/१०/२०२६ (सोयीनुसार)<br>ठिकाण : मा. विभागीय वनाधिकारी, कांदळवन विभाग दक्षिण कोकण अलिबाग |

**कामाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे - वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी ता.जि. रत्नागिरी**

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर अनुदान |
|---|---|---|
| | **रत्नागिरी तालुक्यातील वनविभागाच्या ताब्यात असलेले क्षेत्राचे सिमाकंन करणेकरीता कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर आरसीसी पिलर्स उभारणेसाठी** | |
| १. | Erection of Boundary Demarcation Pillars at Kondsar Village Survey No.64 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | ८३२७५/- |
| २. | Erection of Boundary Demarcation Pillars at Rajwadi Village Survey No. 39 in Aadiware Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | १२११७४/- |
| ३. | Erection of Boundary Demarcation Pillars at Sagve Village Survey No. 25 A, B, C in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | ३४२५०१/- |
| ४. | Erection of Boundary Demarcation Pillars at Rautwadi Village Survey No. 32 in Aadiware Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | १४१३८५/- |
| ५. | Erection of Boundary Demarcation Pillars at Nivendi Village Survey No.150 (Rmt201) in Aare Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | ७८१३९/- |
| ६. | Erection of Boundary Demarcation Pillars at Karivane Village Survey No.8 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | १३९६१९/- |
| ७. | Erection of Boundary Demarcation Pillars at Karivane Village Survey No.7 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | १५१९१५/- |
| ८. | Erection of Boundary Demarcation Pillars at Karivane Village Survey No.9 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | ४७३९८/- |
| ९. | Erection of Boundary Demarcation Pillars at Juve Jaitapur Village Survey No.38 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | १९४९५०/- |
| १०. | Erection of Boundary Demarcation Pillars at Nivendi Village Survey No.161 in Aare Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | ८४२८६/- |
| ११. | Erection of Boundary Demarcation Pillars at Kondsar Village Survey No.63 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | १८६३६१/- |
| १२. | Erection of Boundary Demarcation Pillars at Rahatghar Malgund Village Survey No. 50 in Aare Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | ३५१०२/- |
| १३. | Erection of Boundary Demarcation Pillars at Burambewadi Village Survey No.83 in Aadi-ware Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | १०८८७८/- |
| १४. | Erection of Boundary Demarcation Pillars at Agarwadi Village Survey No.3 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | ५४४१२३/- |
| १५. | Erection of Boundary Demarcation Pillars at Ansure Village Survey No. 132/7 B in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | १३३४७०/- |
| १६. | Erection of Boundary Demarcation Pillars at Chavatwadi Village Survey No.1 in Madban Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | ४७३९८/- |
| १७. | Erection of Boundary Demarcation Pillars at Gavde Ambere Village Survey No. 154, 120 in Gavkhadi Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | २९६५४३/- |
| १८. | Erection of Boundary Demarcation Pillars at Gavkhadi Village Survey No. 146 in Gavkhadi Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division- South Kokan | १५६४४६/- |
| १९. | Erection of Boundary Demarcation Pillars at Karel Village Survey No. 28, 32, 8, 30, 10 in Aadiware Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | ४५९३१४/- |
| २०. | Providing & Erecting 2.10mt height Chain Link Fencing Supported on M.S. Angle Post with Y-type barbed Wire Fencing with Seven rows of wire in Rahatghar Malgund Village Survey No. 50 in Aare Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | ५७३८२९/- |
| २१. | Providing & Erecting 2.10mt height Chain Link Fencing Supported on M.S. Angle Post with Y-type barbed Wire Fencing with Seven rows of wire in Karel Village Survey No. 94 in Aadi-ware Beat Under Ratnagiri Round for the mangrove Division-South Kokan | १५६२२८/- |
| २२. | Erection of Boundary Demarcation Pillars at Adkhal S. No.39, Ambawali Village S.no.639 In Anjarle Beat Under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | २८३३८२/- |
| २३. | Erection of Boundary Demarcation Pillars at Bhopan S. No.61 (1860 Rmt.), Dabhol Village S.no.181 (745 Rmt.) In dabhol beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | ६८३५९२/- |
| २४. | Erection of Boundary Demarcation Pillars at Juekar Mohlla S. No.08 (1268 Rmt.) and Murdi Village S. No.119 (142 Rmt) In Anjarle Beat Under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | ४५३१६८/- |
| २५. | Erection of Boundary Demarcation Pillars at Pangari S. No.72 (500 Rmt.) and Pangari S.No.73 (522 Rmt.) Pangari tarf haveli S. No.119 (188 Rmt.), Pangari tarf haveli S. No.103 (605 Rmt.), Pangari tarf haveli S. No.73 (918 Rmt.) In dabhol Beat Under Dapoli Round for the mangrove Division- South Kokan | ७७४५४७/- |
| २६. | Erection of Boundary Demarcation Pillars at Pangari Tarf haveli S. No.127 (500 Rmt.) and Umbarghar Village S.No.88 and 191 (780 Rmt.) In dabhol beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | ३०७६३७/- |
| २७. | Erection of Boundary Demarcation Pillars at Utamber S. No.86 (690Rmt.) and ambavali S.No.38 (170 Rmt) In anjarle beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | २७१५२४/- |
| २८. | Erection of Boundary Demarcation Pillars at Gothe S. No.31 (845 Rmt.) In Gothe Beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | २५३०६२/- |
| २९. | Erection of Boundary Demarcation Pillars at Shipole Bandar S. No.3 (477 Rmt.), Shipole Bandar S.No.14 (717 Rmt.) Shipole S.no.09 (433 Rmt.), Shipole S.no.10 (252 Rmt Vesvi S.No.20 (284 Rmt.) In Velas beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | ६७७५२७/- |
| ३०. | Erection of Boundary Demarcation Pillars at Bahirwali S. No.2594 B (181 Rmt.), Bahirwali S. No.2594 A (387 Rmt.), Bahirwali S. No.2594 C (279 Rmt.), Bahirwali S. No.2594 D (514 Rmt.) In Songaon Beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | ४१६७८५/- |
| ३१. | Erection of Boundary Demarcation Pillars at Hodkhad S. No.105 A (346 Rmt.) and Hodkhadi Village S. No.105 B (244 Rmt) In Songaon beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | १६२१०६/- |
| ३२. | Erection of Boundary Demarcation Pillars at Maldoli S. No.298 A (254 Rmt.), Maldoli S. No.298 B (92 Rmt.), Maldoli S. No.298 C (105 Rmt.), Maldoli S. No.304 (40 Rmt.), Maldoli S. No.1270 (128 Rmt.) In donwali beat under Dapoli Round for the mangrove Division-South Kokan | ३२५८२७/- |
| ३३. | Erection of Boundary Demarcation Pillars at Waghivari S. No.689 (665 Rmt.) In Donwali beat under Dapoli Round for the mangrove Division- South Kokan | १६८१६९/- |
| ३४. | Erection of Boundary Demarcation Pillars at Pangari S. No.02 (3120 Rmt.) In Donwali Dap-oli Round for the mangrove Division-South Kokan | ७१३९०९/- |
| | **एकूण रक्कम** | ९५७३५६९/- |

तरी इच्छूक कंत्राटदार यांनी निविदा कालावधी वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी येथे निवीदा सादर कराव्यात. अधिक माहितीसाठी वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी यांचे कार्यालयाशी सुट्टीच्या दिवसाखेरीज कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**ठिकाण :- रत्नागिरी**
**दिनांक :- ०७/१०/२०२६**

**(सही)**
**(प्रशांत रमेश निकाळजे)**
**वनक्षेत्रपाल कांदळवन,**
**रत्नागिरी**

# नटसम्राट नाना पाटेकर यांची आकस्मिक 'एक्झिट' धक्कादायक

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भावपूर्ण श्रद्धांजली



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, मुंबई :** ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या आकस्मिक निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील अभिनय आणि संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांची अशी अकाली आणि अचानक 'एक्झिट' मनाला मोठा धक्का देणारी आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

नाना पाटेकर हे मुख्यमंत्री फडणवीस यांचे निकटचे मित्र होते. पडद्यावर जितके मोठे, तितकेच मनानेही मोठे असलेल्या नानांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला एक कालखंड दिला. राष्ट्रभक्त अशी त्यांची प्रतिमा प्रेक्षकांना भावली. 'क्रांतिवीर' ते 'नटसम्राट' या प्रवासात त्यांनी दमदार आणि कसदार अभिनयाचा ठसा उमटविला. परखडपणा आणि बेधडकपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. नाना जिथे जात तिथे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटत असे. सर्वांशी हक्काने, वडिलकीच्या आणि मार्गदर्शकाच्या नात्याने ते संवाद साधत; त्यांच्यात आत-बाहेर असा भेद नव्हता.

मुख्यमंत्री झाल्यापासून नानांमधील हळवा माणूस पाहत आलो, असे फडणवीस म्हणाले. जलयुक्त शिवार अभियानाला पाठिंबा देण्यासाठी नाना पुढे आले. मकरंद अनासपुरे यांच्यासोबत त्यांनी 'नाम फाऊंडेशन'ची स्थापना करून स्वतः शिवारात काम केले. शेतकऱ्यांना मदत करणे आणि दुष्काळी काळात मदतीचा हात पुढे करणे यात ते कायम अग्रणी राहिले.

यंदाही दुष्काळाच्या काळात ते मागे राहिले नसते; मात्र ते अचानक निघून गेले. त्यांच्या निधनाने कला आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली असून, पाटेकर कुटुंबीय आणि चाहत्यांच्या दुःखात सहभागी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

# अतिक्रमणावरून महासभेत प्रशासनाला धारेवर धरले; परेश ठाकूर यांचा जोरदार हल्लाबोल

## दशरथ भंडारी, राजेश डोंगरे आणि रूपाली माने यांच्या निलंबनासह चौकशीची मागणी

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०७, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या आणि विविध प्रकारच्या अनधिकृत व्यवसायांच्या मुद्द्यावरून माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.

शहरातील वाढत्या अतिक्रमणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच प्रभाग समिती 'क'चे अधिकारी दशरथ भंडारी, प्रभाग समिती 'ड'चे अधिकारी राजेश डोंगरे आणि सहाय्यक आयुक्त रूपाली माने यांचे तात्काळ निलंबन करून त्यांची चौकशी करण्यात यावी, अशी जोरदार मागणी महासभेत करण्यात आली.

परेश ठाकूर यांच्या टीमने शहरातील विविध भागांची वैयक्तिक पाहणी केल्याचे सांगत त्यांनी महासभेत अतिक्रमणाची गंभीर परिस्थिती प्रशासनासमोर मांडली. या पाहणीत तब्बल ८०० ते ९०० अनधिकृत फेरीवाले, हातगाड्या तसेच विविध प्रकारचे अनधिकृत व्यवसाय आढळून आल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे शहरात अतिक्रमणविरोधी कारवाई नेमकी कोणत्या पद्धतीने आणि कुठे





केली जात आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

महापालिका प्रशासनाकडून अतिक्रमणविरोधी कारवाई केली जात असल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्ष शहरातील परिस्थिती पाहता रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर मोठ्या प्रमाणात फेरीवाले व हातगाड्या दिसून येत असल्याचे ठाकूर यांनी निदर्शनास आणून दिले. अनधिकृत व्यवसायांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच नागरिकांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिक्रमणावर महापालिकेची कारवाई नेमकी कुठे आहे? असा थेट सवाल करत ठाकूर यांनी प्रशासनाच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काही ठिकाणी कारवाई केली जात असली तरी त्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमणे होत असल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

अतिक्रमणाला आळा घालण्यासाठी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे सांगत, कामात हलगर्जीपणा किंवा दुर्लक्ष आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. याच पार्श्वभूमीवर दशरथ भंडारी, राजेश डोंगरे आणि रूपाली माने यांच्या कामकाजाची सखोल चौकशी करून दोष आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

महासभेत या मुद्द्यावरून प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये चांगलीच चर्चा रंगली. शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न केवळ कारवाईपुरता मर्यादित न ठेवता त्यावर कायम स्वरूपी तोडगा काढण्याची गरज असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. त्यामुळे आता महापालिका प्रशासन या आरोपांवर काय भूमिका घेते आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या चौकशीबाबत कोणता निर्णय घेतला जातो, याकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

# तवा आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांची मैदानी स्पर्धेत दमदार कामगिरीतालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत विविध

## क्रीडा प्रकारांत यश; ७ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०८, डहाणू (पालघर) :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पालघर आणि जिल्हा क्रीडा परिषद, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या डहाणू तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत तवा येथील आदिवासी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बोर्डी येथील एस. पी. एच. हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत तवा आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत पदकांची कमाई करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांनी धावणे, हर्डल्स, भालाफेक, थाळीफेक, तिहेरी उडी तसेच रिले अशा विविध मैदानी क्रीडा प्रकारांत सहभाग घेतला. १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये अनिकेत हाडळ याने ८० मीटर हर्डल्समध्ये प्रथम क्रमांक मिळवत लक्षवेधी कामगिरी केली. त्याचबरोबर ४ बाय १०० मीटर रिले संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षे वयोगटात रुपेश वरठा याने भालाफेक आणि १०० मीटर हर्डल्स या दोन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवला. भार्गव मातेरा याने थाळीफेकमध्ये द्वितीय, तर अवी जाधव याने तिहेरी उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला.

१९ वर्षे वयोगटातही तवा आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपली छाप पाडली. उमेश चौरे याने १५०० मीटर धावण्याच्या प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. रसिक भेस्कर याने भालाफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. सिद्धांत राऊत याने तिहेरी उडीमध्ये तृतीय क्रमांक मिळवला, तसेच ४ बाय ४०० मीटर रिले संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.

तालुकास्तरीय स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारांत चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरावरही हे विद्यार्थी डहाणू तालुक्याचे आणि तवा आश्रमशाळेचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक प्रवीण शिंदे आणि मनेष गावित यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना नियमित सराव, विविध क्रीडा प्रकारांचे तंत्र आणि स्पर्धात्मक तयारी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.



### दिव्यांग उमेशची १५०० मीटरमध्ये उल्लेखनीय कामगिरी

या स्पर्धेतील सर्वांचे लक्ष वेधून घेणारी कामगिरी उमेश चौरे याने केली. उमेश हा दिव्यांग असूनही त्याने १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत इतर स्पर्धकांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला. त्याने तब्बल १०० मीटरच्या फरकाने आघाडी घेत ही स्पर्धा जिंकली. विशेष म्हणजे उमेश चे आई वडील दोघे ही हयात नसून तो एका हाताने अपंग आहे, मात्र रोजचा सराव तसेच प्रतिकूल परिस्थितीवर मात करत केलेल्या या कामगिरीचे डहाणू तालुक्यातील शिक्षक, क्रीडाप्रेमी आणि शैक्षणिक क्षेत्रातून कौतुक होत आहे. उमेशची ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी ही प्रेरणादायी ठरली असून, जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतीही अडचण यशाच्या मार्गातील अडथळा ठरू शकत नाही, याचे उदाहरण त्याने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले.

शाळेचे मुख्याध्यापक संतोष सगर हे विद्यार्थ्यांना सातत्याने क्रीडाक्षेत्राचे महत्त्व पटवून देत त्यांना प्रोत्साहन देतात. तसेच विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये सातत्याने सहकार्य करणाऱ्या शाळेतील सर्व शिक्षकवर्गाने विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तवा आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला नवी उंची मिळाली असून, जिल्हास्तरीय स्पर्धेत ही विद्यार्थी चमकदार कामगिरी करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नवीन पनवेलमध्ये अतिक्रमण विभागाच्या वतीने अनधिकृत टपऱ्यांवर मोठी कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, पनवेल (नवी मुंबई) :** आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते आणि फुटपाथ मोकळे ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने अतिक्रमण विरोधी मोहीम अधिक तीव्र केली आहे. दरम्यान महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' पनवेल येथे अतिक्रमण विभागाच्या वतीने नवीन पनवेल सेक्टर २ मधील महापालिकेच्या प्लॉटवरील अनधिकृत हातगाड्या, अनधिकृत फळे-भाजी विक्री व्यवसाय धारक, अनधिकृत टपऱ्या, फुटपाथवरील अनधिकृत व्यवसाय धारक, यांच्यावर मोठी तोडक कारवाई करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, प्रभाग अधिक्षक राजेश डोंगरे, अरविंद पाटील, जितेंद्र मढवी, अतिक्रमण विभाग प्रमुख अमर पाटील, चारही प्रभागाचे अतिक्रमण विभागाचे मनुष्यबळ उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील मुख्य रस्ते, शाळांचे परिसर, बाजारपेठा आणि सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी ही धडक मोहीम यापुढेही अशीच सुरू राहील, असा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

नागरिक आणि स्थानिक व्यापाऱ्यांनी सार्वजनिक जागांवर अनधिकृतपणे सामान ठेवून वाहतुकीस अथवा पादचाऱ्यांना अडथळा निर्माण करू नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे यांनी पालिकेच्या वतीने केले आहे.

# मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील राजशिष्टाचार भंगाप्रकरणी राज्य शासनाची कडक कारवाई

## चौकशी अहवालानंतर अतिरिक्त आयुक्तांची उचलबांगडी

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून शासकीय कार्यक्रमांच्या आयोजनात राजशिष्टाचाराचे नियम धाब्यावर बसवून लोकप्रतिनिधी व कॅबिनेट मंत्र्यांचा अवमान प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी राजशिष्टाचार विभागाचे सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांच्याकडे केली होती. यानंतर या प्रकरणात राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने अत्यंत गंभीर दखल घेत धडक कारवाई केली आहे. या प्रकरणातील चौकशी समितीच्या अहवालानंतर आणि राजशिष्टाचार विभागाच्या स्पष्ट अभिप्रायानंतर प्रशासकीय कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

१५ एप्रिल २०२६ रोजी मिरा-भाईंदर (पश्चिम) येथील क्रीडा संकुल व सभागृह इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला होता. या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचा मसुदा निवासी उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार अधिकारी, ठाणे) यांच्याकडून तपासून व प्रमाणित करून घेणे बंधनकारक असताना, तसे न करताच थेट छपाई करण्यात आली.

सदर निमंत्रण पत्रिकेत कॅबिनेट मंत्री प्रताप सरनाईक यांचे नाव राजशिष्टाचार आणि ज्येष्ठता क्रमानुसार सन्मानपूर्वक न छापल्याने प्रोटोकॉलचा उघड भंग झाल्याचे सामान्य प्रशासन व राजशिष्टाचार विभागाने आपल्या अभिप्रायात स्पष्ट नमूद केले आहे.

यासोबतच अजून एक प्रकरण म्हणजे ५ मे २०२६ रोजी आयोजित पालिकेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त कामगार दिन सत्कार समारंभाच्या निमंत्रण पत्रिकेतही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अधिकृत मंजुरी न घेता आणि प्रोटोकॉल डावलून मसुदा अंतिम केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

या दोन्ही प्रकरणासंदर्भात अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील ५ सदस्यीय चौकशी समितीने २० जुलै २०२६ रोजी घेतलेल्या बैठकीनंतर अंतिम अहवाल सादर केला. या अहवालात सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रीडा विभाग आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सामान्य प्रशासन विभागाचे २० नोव्हेंबर २०२५ चे परिपत्रक व पालिका आयुक्तांच्या ११ मार्च २०२६ च्या आदेशांचे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाले आहे.

राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ.राजेश गवांदे व नगर विकास विभागाने दिलेल्या निर्देशांनुसार राज्य शासनाने तात्काळ अंमलबजावणी करत राजशिष्टाचार भंगाच्या चौकशीत दोषी आढळलेल्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांची मिरा-भाईंदर महानगरपालिकेतून उचलबांगडी करण्यात आली असून, त्यांची पदावनती वसई-विरार शहर महानगरपालिकेत उपायुक्तपदी (कनिष्ठ पद) करण्यात आली आहे. प्रियंका राजपूत यांच्या बदलीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३९-अ नुसार सचिन बांगर यांची मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदावर तात्काळ नियुक्ती करण्यात आली आहे.

क्रीडा संकुलाच्या उद्घाटनाच्या निमंत्रण पत्रिकेचा मजकूर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून किंवा योग्य त्या विभागाकडून आधी प्रमाणित न करता, बेजबाबदारपणे काम केल्याबद्दल शहर अभियंता दीपक खांबित यांच्यावर शिस्तीचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. त्यामुळे आता याप्रकरणी शासन किंवा संबंधित प्रशासन त्यांच्यावर कोणती कारवाई करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणतात की, प्रशासन हे जनतेचे आणि लोकशाही व्यवस्थेचे सेवक असते. शासकीय कार्यक्रमांमध्ये राजशिष्टाचाराचे पालन करणे हा केवळ एका व्यक्तीचा किंवा मंत्र्याचा सन्मान नसून, तो मतदारसंघातील नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या संविधानात्मक पदाचा सन्मान असतो. प्रशासकीय अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार आणि प्रोटोकॉलची पायमल्ली यापुढे अजिबात सहन केली जाणार नाही. राज्य शासनाने घेतलेली ही कडक कारवाई प्रशासनाला योग्य शिस्त लावणारी ठरेल.

## पनवेलमध्ये 'एक पेड माँ के नाम' वृक्षारोपण मोहीम उत्साहात

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, पनवेल (नवी मुंबई) :** पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेची बांधीलकी जपत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या 'स्वच्छता ही सेवा २०२६' आणि 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत पनवेल महानगरपालिकेतर्फे दि.०७ ऑक्टोबर रोजी चारही प्रभागांमध्ये विशेष वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.

'एक पेड माँ के नाम' या प्रेरणादायी उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागात विविध प्रकारची सुमारे ७०० वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या मोहिमेदरम्यान करंज, जांभूळ, आवळा, कदंब, बकुळ यांसह विविध पर्यावरणपूरक व औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली.

प्रभाग समिती 'अ'मध्ये नगरसेविका योगिता समीर फडके, नगरसेविका विजयश्री संतोष पाटील, नगरसेविका लीना नंदकुमार म्हात्रे, नगरसेवक रवींद्र भगत, नगरसेविका मोनिका महानावर, तसेच सायली सरक आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

प्रभाग समिती 'ब'मध्ये नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक तुषार पाटील, नगरसेविका प्रगती पाटील, नगरसेविका लीना गरड आणि नगरसेवक उत्तम मोर्बेकर यांनी सहभाग घेतला.

रोटरी क्लब ऑफ सनराईजच्या छाया तारळेकर, सेक्टर ११ येथील रायन स्कूलचे विद्यार्थी व शिक्षकही या उपक्रमात सहभागी झाले.

प्रभाग समिती 'क'मध्ये नगरसेविका सीताताई पाटील, समाजसेवक सुनील गोवारी, विनय गोवारी आणि उपस्थित होते.

प्रभाग समिती 'ड'मध्ये महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा, नगरसेविका स्नेहल ढमाले, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, नगरसेविका श्वेता बहिरा, नगरसेविका प्रियांका कांडपिळे, नगरसेविका रुचिता लोंढे, नगरसेवक गणेश कडू, नगरसेवक केतन भगत, नगरसेवक लतीफ शेख, नगरसेविका आर्या जाधव माजी नगरसेवक तेजस कांडपिळे आणि माजी नगरसेविका सुरेखा मोहकर, समाजसेवक प्रवीण जाधव यांच्यासह इतर मान्यवर आणि एन.एस.एस.चे विद्यार्थी उपस्थित होते.

या वृक्षारोपण मोहिमेला पनवेल परिसरातील विविध सामाजिक संस्था, महिला मंडळे आणि समाजसेविकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उद्यान विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या सूचनेनुसार तसेच सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने आणि विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, विशाल हुडेकर, सिद्धार्थ कांबळे, मांगिलाल जाधव, कनिष्ठ अभियंते साकेत पाटील, अतिश पाटील यांच्यासह उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांनी मोहिमेचे नियोजन व आयोजन केले. यावेळी महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, जितेंद्र मढवी तसेच सर्व प्रभागांतील स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.



**रोपांच्या संगोपनाचा संकल्प**

वृक्षारोपणाच्या माध्यमातून केवळ झाडे लावण्यापुरते मर्यादित न राहता, लावलेल्या रोपांचे योग्य संगोपन व संवर्धन करण्याचा दृढ संकल्प उपस्थितांनी केला. 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत पनवेल शहर अधिक आरोग्यदायी, हरित आणि निसर्गरम्य करण्याच्या दिशेने महानगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत मातांच्या गौरवार्थ लावण्यात आलेली ही झाडे भविष्यातील पिढ्यांसाठी शुद्ध हवा, सावली आणि पर्यावरणीय समृद्धीचा अमूल्य वारसा ठरतील, असा विश्वास यावेळी अधिकारी व लोकप्रतिनिधींनी व्यक्त केला.

या वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहिमेमुळे पनवेल शहरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचला असून, नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

## भाडेकरूंची माहिती पोलिसांना देणार कशी? नवी मुंबईची ऑनलाइन सेवा बंद

**अक्षरात : विनोद धुरंधर**

**दि.०८, जुईनगर (नवी मुंबई) :** घरमालकांनी आपल्या घरात राहणाऱ्या भाडेकरूंची माहिती पोलिसांना देणे आवश्यक असताना नवी मुंबई पोलिसांची भाडेकरू माहिती ऑनलाइन पद्धतीने सादर करण्याची वेबसाइट गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे भाडेकरूंची माहिती पोलिसांना कशी द्यायची, असा प्रश्न घरमालकांसमोर निर्माण झाला आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घरमालकांनी आपल्या घरात भाड्याने राहणाऱ्या व्यक्तीची आवश्यक माहिती पोलिसांकडे देणे महत्त्वाचे आहे. ही माहिती ऑफलाइन तसेच ऑनलाइन पद्धतीने देण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, ऑनलाइन पद्धतीने माहिती भरल्यानंतर ती पुढे सबमिट होणे तसेच त्याची प्रिंट मिळण्याची प्रक्रिया सध्या बंद असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

ऑफलाइन पद्धतीने भाडेकरूंची माहिती देण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्यात जावे लागते. त्यासाठी नागरिकांना अनेकदा दोन-तीन चकरा माराव्या लागतात. संबंधित अधिकारी उपलब्ध नसणे, कार्यालयीन कामकाजाचा अतिरिक्त ताण असणे किंवा इतर कारणांमुळे नागरिकांना माहिती जमा करून त्याची पोहोच मिळवण्यासाठी वेळ खर्च करावा लागतो. नोकरी-व्यवसाय करणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे.

त्याच्या तुलनेत ऑनलाइन पद्धतीने भाडेकरूंची माहिती सादर करण्याची प्रक्रिया नागरिकांसाठी अधिक सोयीची आहे. घरबसल्या आवश्यक माहिती भरून ती पोलिसांकडे सादर करता येत असल्याने नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचतो. मात्र, ही ऑनलाइन सुविधा बंद असल्याने नागरिकांना पुन्हा ऑफलाइन प्रक्रियेचा आधार घ्यावा लागत आहे.

भाडेकरूंची माहिती पोलिसांना देणे ही कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाची बाब असल्याने माहिती देण्यासाठीची प्रक्रिया सुरळीत असणे आवश्यक आहे. ऑनलाइन प्रणाली बंद असल्यामुळे माहिती सादर करण्यास विलंब होत असल्यास नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे ऑनलाइन सेवा नेमकी कोणत्या कारणामुळे बंद आहे आणि ती पुन्हा कधी सुरू होणार, याबाबत नवी मुंबई पोलिसांनी स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे.नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन नवी मुंबई पोलिसांनी भाडेकरूंची माहिती ऑनलाइन पद्धतीने सादर करण्याची वेबसाइट व संबंधित प्रणाली विना विलंब सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वेबसाइटमध्ये तांत्रिक अडचण असल्यास ती दूर करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी आणि सेवा पूर्ववत होईपर्यंत नागरिकांसाठी पर्यायी सुलभ व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी आहे.पोलिसांना आवश्यक असलेली माहिती नागरिकांनी वेळेत उपलब्ध करून देणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच ती माहिती देण्यासाठी सुलभ आणि कार्यक्षम व्यवस्था उपलब्ध करून देणेही आवश्यक आहे. ऑनलाइन सुविधा बंद राहिल्यामुळे नागरिकांना माहिती देण्यास उशीर होत असेल, तर त्यासाठी नागरिकांना दोषी धरले जाऊ नये, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. नवी मुंबई पोलिसांनी या समस्येची तातडीने दखल घेऊन भाडेकरूंची माहिती सादर करण्याची ऑनलाइन सेवा पूर्ववत सुरू करावी, तसेच नागरिकांना या प्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सायवनच्या आदिवासी जनसेवा सामाजिक संस्थेची विसर्जन मिरवणूक स्पर्धेत तालुकास्तरीय बाजी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०८, डहाणू (पालघर) :** पालघर पोलीस दल व मुंबई तरुण भारत यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक श्री गणेश मंडळ विसर्जन मिरवणूक स्पर्धा २०२६ मध्ये डहाणू तालुक्यातील सायवन येथील आदिवासी जनसेवा सामाजिक संस्था, सायवन या गणेश मंडळाने तालुकास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे सायवनच्या गणेश मंडळाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात शांतता, शिस्त, सामाजिक सलोखा, पारंपरिक संस्कृतीचे जतन तसेच पर्यावरणपूरक व नियोजनबद्ध विसर्जन मिरवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी पालघर पोलीस दल आणि मुंबई तरुण भारत यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत विविध सार्वजनिक गणेश मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री.मीना, पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुमती जाखड, पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, मुंबई तरुण भारतचे संपादक तसेच पालघर पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'एक मंडळ, एक अंमलदार' या उपक्रमांतर्गत सायवन येथील आदिवासी जनसेवा सामाजिक संस्था या गणेश मंडळाची जबाबदारी कासा पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक वैभव सातपुते यांच्याकडे सोपविण्यात आली होती. मंडळाशी सातत्याने समन्वय साधून गणेशोत्सव व विसर्जन मिरवणुकीचे नियोजन, शिस्त व सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या नियोजनबद्ध सहभागाची दखल घेत सायवनच्या मंडळाला डहाणू तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळाला. या यशामुळे गणेशोत्सव काळात पोलीस व गणेश मंडळ यांच्यातील समन्वय, सामाजिक बांधिलकी आणि शिस्तबद्ध आयोजनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. दरम्यान, 'एक मंडळ, एक अंमलदार' या उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल कासा पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार जितेंद्र उमतोल यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कासा पोलिस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या गावातील सार्वजनिक गणेश मंडळांशी प्रभावी समन्वय साधणे, उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करणे आणि विसर्जन मिरवणुकीचे नियोजन सुरळीत पार पाडणे यासाठी कासा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अमर पाटील, पोलिस उपनिरीक्षक नितीन डोंगरे यांनी नियोजन बद्ध कार्यक्रम हाती घेतला होता, या केलेल्या कामाची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला. सायवनच्या आदिवासी जनसेवा सामाजिक संस्थेने मिळविलेल्या या यशाबद्दल मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थांचे अभिनंदन होत आहे. पोलीस प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली गणेश मंडळांनी सामाजिक सलोखा व शांततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी दिलेला सहभाग या स्पर्धेच्या माध्यमातून अधोरेखित झाला.




## नानांच्या आठवणीने आम्ही टाकळीकर गहिवरले

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** ज्येष्ठ अभिनेते व नाम फाऊंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर यांच्या अकाली निधनाने केवळ अभिनय क्षेत्राची नव्हे तर दुष्काळ निवारण मोहिमेची मोठी हानी झाली आहे. त्यांनी अनेक वर्षांपूर्वी टाकळीच्या ग्रामीण अपंग केंद्राला भेट दिली होती. तसेच जलसंधारण कामाच्या माध्यमातून त्यांचा टाकळीशी स्नेह जुळला होता. या त्यांच्या आठवणीने टाकळीकर गहिवरले. त्यांच्या दुष्काळ निवारण चळवळीला पुढे नेण्याचा निर्धारही आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान, ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांनी आयोजित शोकसभेत करण्यात आला.



आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक, पत्रकार चाँद शेख यांनी नानांचा जीवनपट मांडताना टाकळीशी आलेला त्यांचा ऋणानुबंध सांगितला. नाम फाऊंडेशन व आम्ही टाकळीकरने नुकत्याच राबविलेल्या जलसंधारण कामाने प्रभावित नाना व मकरंद अनासपुरे यांनी पुढील वर्षीही टाकळीत जलसंधारण कामांना मंजुरी दिल्याची आठवण करून देताना ही कामे प्रभावीपणे करण्यात येऊन त्यांच्या आठवणी जपल्या जाणार असल्याचे सांगितले.

यावेळी ग्रामीण अपंग केंद्राचे संचालक रावसाहेब झावरे, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, सामाजिक कार्यकर्ते श्रावण गायकवाड यांनी नानांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी उपसरपंच रामा तराळ, माजी सरपंच शिवाजी खिलारी, संजय उदावंत, सेवा सोसायटीचे व्हा. चेअरमन मोहन रांधवण, आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विलास गोसावी, गीताई प्रतिष्ठानचे अध्यक्ष तारकराम झावरे, प्रा. किसनराव पायमोडे, संजय झावरे, संजय कुरकुरे, शिवाजी खामकर, हरीभाऊ नरसाळे, भीमाजी लोंढे, विश्वनाथ गोरे, प्रकाश गोरे, संतोष खिलारी, बाळासाहेब वाळुंज, पोपट बोऱ्हाडे, काशिनाथ पायमोडे, एन. सी. शिंदे, माऊली पायमोडे, पांडुरंग शेळके आदींसह ग्रामस्थ, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंचक्रोशी विद्यालयाच्या खेळाडूंची विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी



**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.०८, पाडळी (खंडाळा) :** पंचक्रोशी विद्यालय पाडळी, सुखेड बोरी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सातारा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत कोल्हापूर येथे झालेल्या विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. तालुका व जिल्हास्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यानंतर खेळाडूंनी सातारा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत विभागीय स्तरावर सहभाग घेतला. अत्यंत चुरशीच्या सामन्यात खेळाडूंनी मेहनत, जिद्द, चिकाटी आणि संघभावनेच्या जोरावर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या यशामुळे पंचक्रोशी विद्यालय, पाडळी-सुखेड-बोरी, खंडाळा तालुका तसेच सातारा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

या यशासाठी प्रशिक्षक सुनील भैय्या धायगुडे पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुख्याध्यापक डोईफोडे सर, सपकाळ सर, लोखंडे मॅडम, उत्तम नाना धायगुडे आणि नवनाथ धायगुडे यांचेही खेळाडूंना मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. खेळाडूंच्या या यशाबद्दल विद्यालयातील शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ व क्रीडाप्रेमींकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पुढील स्पर्धांसाठी खेळाडूंना मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

## थोडक्यात बातम्या

### मिरा-भाईंदर महापालिकेने मराठी नाटकांची सवलत कायम ठेवावी - मराठी एकीकरण समितीची मागणी



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा-भाईंदर :** दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठी एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मिरा-भाईंदर महानगरपालिका उपमहापौर ध्रुव किशोर पाटील आणि अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

या निवेदनाद्वारे समितीने मागणी केली आहे की, मराठी नाट्य व कलाकृतींना महापालिकेकडून मिळणारी विशेष सवलत कायम ठेवण्यात यावी. तसेच, ३ तासांच्या नाट्य प्रयोगासाठी ६ तासांचे भाडे आकारण्याची पद्धत बंद करावी, जेणेकरून मराठी रंगकर्मींना दिलासा मिळेल.

मराठी भाषेचा आणि कलेचा प्रसार होण्यासाठी महापालिकेने सहकार्य करावे, असेही या निवेदनात म्हटले आहे. यावेळी मराठी एकीकरण समितीचे पदाधिकारी, मनसेचे संदीप राणे, काँग्रेस युवा नेते सिद्धेश राणे आणि त्यांचे इतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भातसा धरणाच्या उजव्या कालव्यातून शेतीसाठी तातडीने पाणी सोडा

**माजी आमदार पांडुरंग बरोरा यांचे प्रशासनाला पत्र**



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०८, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील भातसा धरण परिसर व परिसरातील शेतकरी पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहेत. सध्या पावसाने खंड दिल्याने (दडी मारल्याने) शेतातील उभ्या पिकांना पाण्याची अत्यंत गरज भासत आहे. ऐन मोसमात वेळेवर पाणी न मिळाल्यास भातशेतीसह इतर खरीप पिकांचे प्रचंड नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन भातसा धरणाच्या उजव्या कालव्यातून शेतीसाठी तातडीने पाणी सोडण्यात यावे, अशी आग्रही मागणी शहापूर विधानसभेचे माजी आमदार पांडुरंग महादू बरोरा यांनी प्रशासनाकडे केली आहे.

या संदर्भात माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी ठाणे जिल्हाधिकारी, अधीक्षक अभियंता (ठाणे पाटबंधारे मंडळ) आणि कार्यकारी अभियंता (भातसा धरण व्यवस्थापन) यांना ईमेल व पत्राद्वारे अधिकृत निवेदन दिले आहे. आपल्या पत्रात त्यांनी स्पष्ट केले की, भातसा धरणातील उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांना गरजेनुसार तातडीने पाणी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. पिकांना दिलासा देण्यासाठी संबंधित विभागाने तत्काळ पाहणी करावी आणि पाणी वितरणात स्थानिक शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळावा याची खबरदारी घेत उजव्या कालव्यातून पाणी सोडण्याचे नियोजन करावे, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. शेतकरी संकटात असल्याने प्रशासनाने यावर विनाविलंब निर्णय घेऊन कालव्याद्वारे पाणी सोडावे, अशी मागणी त्यांनी लावून धरली आहे.

### सरकारी कार्यालयांत दिवाळी गिफ्टला 'नो एंट्री'; भेट वस्तूमुक्त, भ्रष्टाचार मुक्त आपची मागणी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सरकारी कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मिठाई, ड्रायफ्रूट, काजू-बदाम तसेच महागड्या भेटवस्तूंवर बंदी घालावी, अशी मागणी आम आदमी पार्टीने संबंधित शासन-प्रशासनाकडे केली आहे. सरकारी कामाच्या बदल्यात कोणत्याही स्वरूपाची भेट स्वीकारली जाऊ नये. यासाठी स्पष्ट नियम करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

सरकारी अधिकारी-कर्मचारी हे जनतेचे सेवक असल्याने शासकीय काम करून देण्याच्या मोबदल्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भेटवस्तू देण्याची पद्धत वाढू नये. अशी भूमिका आपकडून मांडण्यात आली आहे. दिवाळीसह वाढदिवस अथवा अन्य कोणत्याही प्रसंगी सरकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी भेटवस्तू स्वीकारण्याबाबत स्पष्ट मार्गदर्शक नियम लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रत्येक सरकारी कार्यालयात प्राप्त होणाऱ्या भेटवस्तूंची नोंद करण्यासाठी स्वतंत्र 'गिफ्ट रजिस्टर'अनिवार्य करावे,अशी मागणी आपने केली आहे.

या नोंदवहीत भेट देणाऱ्या व्यक्तीचे नाव, भेटवस्तूचे स्वरूप,त्याची माहिती तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्याचे नाव नोंदवावे, असेही सुचविण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करून भेटवस्तू स्वीकारल्याचे आढळल्यास चौकशी करून नियमानुसार विभागीय तसेच कायदेशीर कारवाई करावी, संबंधित प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांनुसार आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांसाठी सोपी आणि सुलभ तक्रार व्यवस्था सुरू करावी. तसेच प्रत्येक सरकारी विभागाच्या वेबसाइटवर भेटवस्तू स्वीकारली जाणार नाही'असा स्पष्ट संदेश प्रसिद्ध करावा,अशी मागणीही आपकडून करण्यात आली आहे. सरकारी कामासाठी नागरिकांनी अधिकारी - कर्मचाऱ्यांना दिवाळी, वाढदिवस किंवा अन्य कोणत्याही प्रसंगी भेटवस्तू देऊ नयेत,असे आवाहन आम आदमी पार्टीने केले आहे,याबाबत जनजागृती अभियान राबवावे आणि सार्वजनिक पदाचा वापर वैयक्तिक लाभासाठी होऊ नये. यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.